तपासी अधिकारी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** शेवगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0037 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/01/2026 04:40

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 19/01/2026
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 19/01/2026
**Time From (वेळेपासून):** 13:41 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/01/2026 **Time (वेळ):** 04:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 002

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/01/2026 04:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भुमी अभिलेख कार्यालय,शेवगाव,ता शेवगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोलीस निरीक्षक अमोल सदाशिव वालाडे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,शेवगांव,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक,शेवगांव,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9011186699

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | किरण अशोक कांगणे | | | 1. उपअधिक्षक भुमी अभिलेख, शेवगांव,राह- प्लॉट नंबर 5, अभयनगर, ,ढवण वस्ती, सावेडी,ता जिअहिल्,शेवगांव, अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | देवेंद्र त्रिंबक फुंदे | | | 1. माउलीनगर,शेवगांव ताशेवगांव , जिअहिल्यानगर शेवगांव |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि.20/01/2026

मी अमोल सदाशिव वालझाडे, वय 46 वर्षे, पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक, मो.नं. 9011186699.

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नाशिक येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे एक वर्षापासुन कार्यरत आहे. दि.16/01/2026 रोजी आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात हजर असताना मा.पोलीस अधिक्षक श्री.भारत तांगडे सो यांनी समक्ष बोलावुन बोधेगाव,ता.शेवगाव,जि.अहिल्यानगर येथील एक तक्रारदार नामे श्री.दिपक भिमराव तागडे यांनी आमचेशी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाच मागणीची तक्रार असल्याचे कळविले व ते लोकसेवक यांस दि. 19/01/2026 रोजी उप अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय शेवगाव,ता.शेवगाव,जि.अहिल्यानगर येथे भेटणार असलेबाबत सांगितले व तक्रारदार यांचे तक्रारीप्रमाणे योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशीत केले. त्याअनुशंगाने दिनांक 18/01/2026 रोजी आम्ही कार्यालयात हजर असलेले पोकाँ सुरेष चव्हाण यांना राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दोन पंच साक्षीदार यांना दिनांक 19/01/2026 रोजी सकाळी 07.00 वा.कार्यालयात बोलाविणेबाबत लेखी पत्र दिले.त्याप्रमाणे दिनांक 19/01/2026 रोजी सकाळी 07.00 वा. राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दोन कर्मचारी पंच कामगिरीकरीता ला प्र.वि.कार्यालय,नाशिक येथे हजर झाल्यानंतर त्यांना आमची व पोहेकाँ संदिप हांडगे,पोकाँ सुरेश चव्हाण अशी सापळा पथकाची ओळख करुन दिली व त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय? याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली.आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकीय वाहन क्रमांक एमएच-15 जे एस.3186 ने 07.30 वा. निघुन 12.15 वा. चे दरम्यान शेवगाव-नेवासा रोडवरील शेवगांव येथील अजिंक्य लॉन्स येथे सुरक्षित ठिकाणी पोहचलो. त्यानंतर सदर ठिकाणी तक्रारदार हे त्यांच्याकडील मोटारसायकल क्र. एम.एच.16 डी.यु 1021 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.दिपक भिमराव तागडे वय- 46 वर्षे, धंदा- मजुरी,रा.बोधेगाव,ता.शेवगाव,जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, माझे मौजे बोधेगाव, ता. शेवगाव, जि. अहिल्यानगर येथील सिटी सव्हे नंबर 489 या मिळकत पत्रीकेवर सत्ताप्रकार '' फ '' ऐवजी '' अ'' या प्रमाणे दुरुस्त करुन मिळणेबाबत मी मा. उपसंचालक भुमीअभिलेख नाशिक प्रदेश नाशिक यांचे कार्यालयात दिनांक 07/08/2025 रोजी अर्ज केला होता.सदर अर्ज प्रकरणी जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख शेवगाव, जि. अहिल्यानगर यांचे कार्यालयाकडुन उपअधिक्षक भुमी अभिलेख शेवगाव यांना चौकशी अहवाल सादरकरणे बाबत आदेशित झाल्याने त्यानुसार उप अधिक्षक भुमी अभिलेख शेवगाव यांनी दिनांक 31/10/2025 रोजी त्यांच्या कार्यालयाकडील परीक्षण भुमापक यांनी स्थळ पाहणी करुन त्याबाबतचा स्थळ पाहणी पंचनामा करुन चौकशी अहवाल तयार करुन दिनांक 22/12/2025 रोजी जिल्हा अधिक्षक भुमीअभिलेख कार्यालय अहिल्यानगर यांचे कार्यालयास सादर केला. सदर अहवालावरुन जिल्हाभुमी अभिलेख कार्यालय,अहिल्यानगर यांनी मौजे बोधेगाव, ता. शेवगाव येथील सिटी सव्हे नंबर 489 चे उता-यावरील धारणप्रकार/सत्ताप्रकार ''फ'' ऐवजी ''अ'' मधे दुरुस्त होणेसाठी उप अधीक्षक, भुमी अधिक्षक कार्यालय शेवगाव,

बजावणी झाली अगर कसे? हे बघण्यासाठी उपअधिक्षक भुमी अधिक्षक कार्यालय, शेवगाव, जि. अहील्यानगर येथे दिनांक 16/01/2026 रोजी गेलो असता तेथील उपअधिक्षक श्री.किरण अशोक कांगणे साहेब यांनी मला सांगीतले की,तुझी फेरफारची नोंद आदेश करण्यासाठी 20 हजार रुपयांची मागणी केली. मला उपअधिक्षक श्री. किरण कांगणे यांना लाच म्हणुन 20 हजार रुपये देण्याची इच्छा नाहीतरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.माझ्यात व किरण कांगणे यांच्यात कोणताही भांडणतंटा अगर पैसे उसणवारीचा व्यवहार नाही. श्री. किरण कांगणे यांनी माझ्याकडे मागीतलेली लाचेची रक्कम मी माझ्या बचतीतील पैशातुन हजर करेल.'' अशी तक्रार सांगितली.आम्ही तक्रारदार श्री.तागडे यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारी वर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री.दिपक तागडे यांचे तक्रारीप्रमाणे लोकसेवक . श्री. किरण कांगणे साहेब यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री.दिपक तागडे व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तक्रारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली.त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना श्री. किरण कांगणे हे कोठे भेटतील याबाबत विचारले असता त्यांनी लोकसेवक श्री.कांगणे हे उपअधिक्षक भुमी अधिक्षक कार्यालय,शेवगाव,जि.अहिल्यानगर येथे भेटणार असल्याचे सांगितले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तक्रारदार श्री.तागडे व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तक्रारदार श्री.तागडे यांच्या शर्टचे आतमध्ये बनियानला सेफ्टी पिन लावुन पाउच मध्ये ठेवले व आम्ही दिल्या सुचने प्रमाणे तक्रारदार हे पंच नं. 1 यांचेसह तक्रारदार श्री.तागडे यांच्या दुचाकी वाहनाने लोकसेवक श्री. किरण कांगणे यांची भेट घेण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शेवगाव, जि. अहिल्यानगर येथे जाण्याकरीता 13/41 वाजता रवाना केले. त्यानंतर 14/46 वाजेच्या सुमारास तक्रारदार व पंच

घडलेल्या घटने विशयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे रवाना होउन उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,शेवगाव,जि.अहील्यानगर येथे गेलो.तेथे श्री.कांगणे हजर होते.त्यावेळी तक्रारदार श्री.तागडे यांनी लोकसेवक श्री.कांगणे यांना नमस्कार कांगणे साहेब असे बोलले व त्यांची मौजे बोधेगाव, ता. शेवगाव येथील सिटी सव्र्हे नंबर 489 चे उता-यावरील धारणप्रकार/सत्ताप्रकार ''फ'' ऐवजी ''अ'' मधे दुरुस्त नोंद करण्याच्या मोबदल्यात लोकसेवक कांगणे उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय शेवगाव यांनी तडजोडी अंती 20,000/- रुपये लाचेची मागणी केली व सदर लाचेची खाजगी इसम देवेंद्र फुंदे याचेकडे देण्यास सांगितले अशा आशयाची हकीगत सांगितली.लोकसेवक कांगणे यांनी मागणी केलेल्या लाचेच्या संदर्भाने खाजगी इसम फुंदे यांच्या विरूद्ध उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालय, शेवगाव येथे लाचेचा सापळा कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरले. आम्ही तक्रारदार यास लोकसेवक कांगणे यांनी खाजगी इसम फुंदे यांच्याकडे दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या 500 रुपये दराच्या 40 नोटा असे एकुण 20,000/- रूपये हजर केले सदर हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. तक्रारदार व पंचाना अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक आमचे सुचनेवरून पोहेकॉ हांडगे यांनी करून दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सापळा कारवाई दरम्यान करावयाच्या कार्यवाही बाबत तक्रारदार,दोन्ही पंच व सापळा पथक यांना योग्य त्या सुचना देवुन समजावुन सांगितल्या. लाचेच्या नोटा तक्रारदार यांच्या ताब्यात देवुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यात नवीन मेमरीकार्ड टाकुन तक्रारदार श्री.दिपक तागडे यांचे शर्टचे आतील बनियानला सेफ्टी पिनने लावुन तक्रारदार व पंच नं. 1 यांना खाजगी इसम फुँदे यांची भेट घेण्याकरीता उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, शेवगाव येथे 15/30 वाजता तक्रारदार यांचेकडील मोटारसायकलने रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक शासकिय वाहनाने रवाना होवुन सदर कार्यालयाचे आवारात सापळा आयोजित केला. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार यांच्याजवळ एक इसम आला व सदर इसमाने तक्रारदार यांचे सोबत काहिवेळ चर्चा केली व चर्चा करत असताना तक्रारदार यांनी लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 15/41 वाजताचे सुमारास केला. लागलीच आम्ही पंच नं. 2 व सापळा पथकासह जावुन लाच रक्कम स्विकारणा-या इसमांस ताब्यात घेतले. आम्ही सदर इसमांस त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव देवेंद्र त्रिंबक फुंदे वय- 40 वर्ष, रा. शेवगाव ता.शेवगांव जि.अहिल्यानगर असे सांगितले. त्यावेळी आम्ही पंच नं.2 करवी ताब्यात घेतल्या व सदर नोटांच्या नंबरची पडताळणी केली असता नोटांचे नंबर सापळा पुर्व

पंचनाम्यामधील नोटांच्या नंबरशी तंतोतंत जुळुन आले.सदर बाबत फोटोग्राफ घेण्यात आले. त्यानंतर आम्ही लोकसेवक किरण कांगणे यांच्याबाबत विचारले असता खाजगी इसम फुंदे यांनी लोकसेवक किरण कांगणे हे जवळच शेवगांव-अहिल्यानगर रोडवरील मंगेष लॉजिंग हॉटेल येथे आरामासाठी गेले असले बाबत कळविल्याने आम्ही सापळा पथकातील पोलीस अंमलदार यांच्या मार्फतीने लोकसेवक किरण कांगणे यांना शेवगांव-अहिल्यानगर रोडलगत असलेले मंगेष लॉजिंग हॉटेल, येथील रुम नंबर 105 मध्ये जावुन त्यांना पडताळणी कारवाई दरम्यान त्यांनी तक्रारदार श्री.तागडे यांचेकडे लाचेची मागणी करुन सदर लाचरक्कम खाजगी इसम फुंदे यांचेकडे देण्यास सांगितले वरुन झालेल्या यशस्वी सापळा कारवाईची माहिती देवुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांना त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव किरण अशोक कांगणे वय- 52 वर्ष, पद- उपअधिक्षक,भुमी अभिलेख,शेवगांव, जि.अहिल्यानगर असे सांगितले.

त्यानंतर आम्ही सदर रुम नंबर 105 मध्ये खाजगी इसम देवेंद्र फुंदे खाजगी इसम यांनी स्विकारलेल्या लाचेच्या नोटांची, फुंदे यांच्या हाताची अंधारात अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी केली असता, फुंदे यांच्या उजव्या हाताच्या तळहातास व बोटांच्या पे-यांना अँन्थ्रासिन पावडरची निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटो ग्राफ घेण्यात आले व त्यानंतर आंम्ही खाजगी इसम फुंदे व लोकसेवक किरण कांगणे यांना ताब्यात घेवुन पंच सापळा पथकासह सरकारी वाहनाने शेवगांव-अहिल्यानगर रोडने अहिल्यानगर येथील सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय विश्रामगृह येथील दोन कक्ष ताब्यात घेवुन सदर ठिकाणी पंचनाम्याचे कामकाज केले.

तरी दिनांक 19/01/2026 रोजी 13/41 ते 14/46 वाजेच्या दरम्यान उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय,शेवगाव,जि.अहील्यानगर येथे लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक किरण अशोक कांगणे उपअधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, शेवगांव, ता.शेवगांव, जि.अहिल्यानगर यांनी तक्रारदार श्री.तागडे यांच्याकडे मौजे बोधेगाव येथील सिटी सर्वे नंबर 489 चे उता-यावरील धारण प्रकार /सत्ता प्रकार हे क्षेत्र '' फ'' ऐवजी ''अ'' मध्ये दुरुस्ती ची नोंद करण्याच्या मोबदल्यात स्वतःच्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन स्वतःचा सांपत्तीक फायदा करुन घेण्याच्या हेतुने तक्रारदार यांचेकडे तडजोडी अंती 20,000/- रूपये लाचेची मागणी करुन सदर [illegible] खाजगी इसम [illegible] फुंदे यांच्या कडे [illegible] सांगितले असता सदर 20,000/- [illegible] रक्कम यशस्वी सापळा कारवाई दरम्यान खाजगी इसम फुंदे यांनी भूमी अभिलेख कार्यालय, शेवगाव येथील गेट जवळ तक्रारदार यांचे कडुन पंचा सम तक्रारदार यांचे कडुन पंचा समक्ष स्विकारली आहे म्हणुन लोकसेवक 1) किरण अशोक कांगणे वय- 52 वर्ष, उपअधिक्षक भुमी अभिलेख, शेवगांव, जि. अहिल्यानगर,वर्ग -2 ,राह- प्लॉट नंबर 5, अभयनगर, ढवण वस्ती, सावेडी,ता. जि.अहिल्यानगर व 2) खाजगी इसम देवेंद्र त्रिंबक फुंदे वय- 40 वर्ष, राह-माउलीनगर,शेवगांव ता.शेवगांव जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7,12 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली.
दिनांक- 20/01/2026

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले)**:**

santosh ramchandra mutkule(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**

**Rank** (पद)**:** **No.**(क्र.)**:**

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh ramchandra
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):